# भारतीय जनता पक्ष

(केंद्रिय कार्यालय)
11, अशोक रोड, नवी दिल्ली- 110001
फोनः 011-23005700, फॅक्स- 011-23005787

# आर्थिक ठराव

महागाई आणि भ्रष्टाचार वर्तमान सरकारची एक आगळी ओळख बनली आहे. अर्थशास्त्री असलेले देशाच्या पंतप्रधानांच्या नेतृत्त्वाखाली अर्थमंत्र्यांचा निष्क्रियपणा सहन करावा लागत आहे अशी दशा झाली आहे. प्रत्येक आर्थिक परिबलोमा सतत कपात होत आहे. भाजप भारताच्या बिकट होत असलेल्या अर्थव्यवस्थेबद्दल चिंता व्यक्त करत आहे. यासंदर्भात सामान्य जनता देखील चिंताग्रस्त आहे. दिशाहीन स्थिती आणि नीतिगत पक्षाघात याकरिता कॉग्रेसच्या नेतृत्त्वाखालील युपीए सरकारंच यात जबाबदार आहे असे भाजप मानतो.

वर्ष 1988 मध्ये भाजपाच्या नेतृत्त्वाखालील एनडीए सरकार फक्त 4 टक्के विकासदर असलेली अर्थव्यवस्था आधीच्या सरकारकडून मिळाली होती, जी सुधारुन भारत आर्थिक सुपरपावर बनण्याच्या दिशेने अर्थव्यवस्थेचा झपाट्याने विकास केला.

श्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे भारताने अनेक दशकांत पहिल्यांदाच 2004 साली 8.25 टक्के विकासदर मिळवले. एनडीए सरकारने सत्ता सोडली आणि अर्थव्यवस्थेची अशी हालत झाली.

युपिए सरकारकडून आर्थिक विकासाला वेगवान बनवण्याची चांगली आशा पण नाही आहे. उच्च विकासदर आणि चूकवणीना आदान-प्रदान
च्या स्थितीबरोबरच महागाईच्या प्रमाणात कपात झाली आणि कमी व्याजदर

तसेच सुंदर आर्थिक विकास आणि ही मॅक्रो आर्थिक स्थिरता मिळवण्यासाठी युपिए सरकारला चांगला आदर्श होता.
आता सर्व जण यामुळे निराश झाले आहेत की, युपिए सरकार अवघड आर्थिक सुधारणांचे मार्ग अवलंबत आहे. युपिए सरकारचा नऊ वर्षाच्या अवधी दरम्यान महागाईचा दर पाच टक्के ठेवून दहा टक्क्यापेक्षा अधिक विकास करायचा होता. परंतु याच्या विपरित परिस्थिती झाली. युपिए सरकारच्या आर्थिक अव्यवस्थेमुळे देश अनेक वर्षे पिछाडीवर गेल्याचे दिसून येते. सुरुवातीस एकूण राष्ट्रीय उत्पन्न चार टक्के होता ते वाढून 8 टक्के झाले आणि युपिए सरकारने त्याला पुन्हा चार टक्क्यांवर आणले.

**<u>मॅक्रो स्थिती</u>**

अर्थव्यवस्थेच्या मॅक्रो स्थिती खुपच चिंताजनक आहे, कारण की विकासदराबरोबरच अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रात पतन होत आहे. आय.आय.पी. निर्देशांक सतत खालावत आहे. डिसेंबर 2012 मध्ये आय.आय.पी. 0.5 टक्के होता. कोळसा, खाण,ऊर्जा,खत आणि नैसर्गिक गॅस सारख्या महत्वाच्या क्षेत्र पण आता नकारात्मक झोनमध्ये येऊ लागली आहेत.
सतत वाढत असलेली आर्थिक तूट पण नाजूक परिस्थितीत येऊन पोचली आहे. सध्या त्याचे प्रमाण 5.5 टक्के झाले आहे. सरकार दर वर्षी बजेटमध्ये आर्थिक तूट कमी करण्याचे वचन देते. असे असून देखील आर्थिक तूट वाढत आहे. दुसरीकडे राज्यांची आर्थिक तूट कमी होत आहे, जी सूचना देते की, आर्थिक तूट वाढण्यामागे केंद्र सरकारच जबाबदार आहे. त्याकरिता फक्त राज्य सरकारलाच दोषी ठरवण्यामागे कारण नाही.
भाजपच्या नेतृत्त्ववाल्या एनडीए सरकारने आर्थिक तूट आणि बजेट व्यवस्थेबाबत ऐतिहासिक आर्थिक नियम बनवले होते. ज्यामुळे आर्थिक तूट 3 टक्क्यांहून खाली आली. दुर्दैवाने कॉंग्रेसच्या नेतृत्त्ववाली युपीए सरकारने त्या नियमांचे पालन केले नाही.

करंट अकाऊंटमधील तूट पण चिंतेचा विषय आहे, कारण की त्याचे प्रमाण एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या 5.4 टक्के आहे जे योग्य नाही. वर्तमान परिस्थितीकरिता एक महत्त्वपूर्ण कारण बचत अर्थात गुंतवणूकीत मोठ्या प्रमाणात कपात झाली आहे. ज्यामुळे आर्थिक विकासदर घटत आहे. एवढेच नव्हे तर करंट अकाऊंटमधील तूट आली. ज्यामुळे करंट अकाऊंटमधील तूट वाढत आहे. अर्थव्यवस्थेतील नवे विशारद पण सांगू शकतील की असे करणे म्हणजे वर्तमान जबाबदारी निभावण्यासाठी भावी पिढीच्या संसाधनांना नष्ट करण्यासारखे आहे.

सतत वाढणारी करंट अकाऊंटमधील तूट आणि आर्थिक तूट पाहता गेल्या 12 महिन्यात रुपायाच्या किंमतीत 20 टक्क्याने अधिक कपात झाली आहे. त्याच्या तुलनेत अनेक अन्य आंतरराष्ट्रीय चलनाच्या मुल्यात

डॉलरची तुलनेत अधिक झाली आहे.भारताच्या डोक्यावर विदेशी कर्ज 250 अब्ज डॉलर पेक्षा वाढून आता 340 अब्ज डॉलर इतके झाले आहे, जे 30 टक्के आहे.

संभवित आंतरराष्ट्रीय डाउनग्रेड समोर सरकारने उतावळेपणाने अनेक निर्णय घेण्याचे नक्की केले आहे. ज्याचा परिणाम अनेक क्षेत्रात किंमती वाढल्या आहेत आणि योजनांचा आर्थिक वाटपात कपात करण्यात आली. अशी पावले उचलण्यास भाजप विरोध करते.

थेट परदेशी गुंतवणूक गेल्या त्रैमासिक कालावधीत कपात होऊन 43 टक्के झाली. दुसरीकडे आपल्या देशातील गुंतवणूकदार सुद्धा विदेशात गुंतवणूक करत आहेत. वर्ष 2000 मध्ये आंतरिक एफडीआय चे 10 टक्के विदेशात गेले. वर्ष 2011-12 मध्ये त्याचे प्रमाण आंतरिक एफ.डी.आय. च्या 50 टक्के राहीले.

परिस्थितीत सुधारणा आणण्यासाठी आर्थिक रिस्पॉन्स पण पक्षपातीपणाचा आहे. विद्यमान सरकार महसुल वाढविण्यासाठी कुशलतापूर्वक कारवाई करण्याऐवजी बाजारात टॅक्स वाढवणे आणि किंमती वाढविण्यात व्यस्त आहेत. ज्यामुळे सामान्य जनतेवर भार पण वाढत आहे.

**<u>महागाई-वास्तविक दुःखदायक कारण</u>**

विद्‌यमान सरकार महागाईवर नियंत्रण राखण्यासाठी आणि त्यात कपात करण्यासाठी असफल ठरले आहे. दुर्दैवाने ही महागाई नैसर्गिक आपत्तीचे परिणाम नाही तर युपीए सरकाने दिलेली भेट आहे. धान्याच्या गोदामात अव्यवस्था आणि वितरणातील विसंगतेच्या कारणाने महागाईवर दबाव वाढला आहे. देशाच्या गोदामात फक्त तीन करोड टन धान्याचा साठा पाहिजे तर त्याच्या ऐवजी सात करोड धान्याचा संग्रह करण्यात आला आहे. ज्यामुळे बाजारात धान्याची कमतरता भासत असून त्यामुळे भाव वाढले आहेत. तसेच धान्य कुपोषित बालकांना वितरण करण्याऐवजी ते कोठारात सडवले जात आहे. तसेच जनावरांचा चारा म्हणून विदेशात निर्यात करण्याशिवाय दारु बनविण्यासाठी त्याचा उपयोग करण्यात येतो.

जनता अभूतपूर्व महागाईच्या बोजाखाली दबली आहे. जनतेला त्यातून दिलासा मिळेल अशी इच्छा आहे. त्याऐवजी सरकारने ईंधनाच्या भावात डीरेग्युलेशन करुन डीझेलच्या दरात वाढ करण्यात आली. वैश्विक अनुभवावरुन असे दिसते की फॉरवर्ड एक्सचेंजच्या माध्यमातून वायदा बाजारातपण जीवनावश्यक वस्तुंचे भाव वाढले आहेत. असे असून देखील सरकार त्याकडे काना डोळा करीत आहे. महागाई पाहता नोकरी करणारे तसेच मध्यम वर्गातील लोकांची वास्तविक आवक घटली आहे. ज्यांचे वेतन आणि मजुरीचे दर महागाई सोबत जोडले जात नाहीत.त्यांच्या जीवनधोरणावर याचा फार मोठा परिणाम झाला आहे. ते वाईट परिस्थितीत जीवन जगत आहेत.

भाजप डीझेल, गॅस, पेट्रोल, रेल्वे आणि अन्य सेवांच्या मुल्यांत करण्यात आलेली वाढ त्वरित मागे घेण्याची मागणी करते. वाढत असलेला जनाक्रोशामुळे दोन दिवस भारत बंद ठेवण्यात आला होता.

**<u>लूट चालूच आहे...</u>**

कॉंग्रेसच्या नेतृत्त्ववाल्या युपिए सरकार भ्रष्टाचाराचा विकल्प बनली आहे. वीवीआयपी हॅलिकॉप्टर घोटाळा, कृषि लोनमाफी घोटाळा हे सरकारच्या विविध घोटाळ्यांच्या मालिकेतील नवीन घोटाळे आहेत. सरकार दोषींना शिक्षा द्यायच्या बदल्यात आरोपींना वाचवण्याच्या प्रयत्नात आहेत. भाजप या दोन्ही घोटाळ्यांचा तपास न्यायालयाच्या देखरेखीखाली करण्यात यावा तसेच लोनमाफी साठी पात्र शेतक-यांना त्वरित दिलासा देण्याची मागणी करत आहे.

**<u>एनडीए वि. युपिए</u>**

देशाच्या पायाभुत सुविधांच्या विकासासाठी एनडीए कडून करण्यात आलेल्या प्रयत्नांना युपिए च्या शासनकाळात गेल्या दहा वर्षात फटका पडला आहे. एनडीए सरकार रोज 11 किलोमीटर राष्ट्रीय महामार्गाचे निर्माण करत होती, तर युपिए सरकार ते लक्ष 22 किलोमीटर प्रतिदिन ठेवले होते. असे असले तरी राष्ट्रीय महामार्ग निर्माण करण्याचे प्रमाण आता केवळ 3 किलोमीटर वर येऊन ठेपलय. पूर्व-पश्चिम उत्तर-दक्षिण कॉरिडोर दिवास्वप्नच आहे. ग्राम रस्ते विकास योजना पण धीमी पडली आहे. विद्युत उत्पादन क्षेत्रात 11 व्या पंचवर्षीय योजनेत 78,000 मेगावॅटचे लक्ष राखण्यात आले होते, जे वास्तविक पाहता 54,000 मेगावॅट इतके झाले आहे. रेल्वे, बंदरे, खनीजतेल आणि गॅस क्षेत्रात पायाभुत सुविधा कार्य निराशाजनक पद्धतीने होत आहेत. एनडीएच्या शासनकाळात चार करोड परिवारांना गॅस कनेक्शन देण्यात आले, तर युपिए सरकारने नउ वर्षात एवढे कनेक्शन दिले नाहीत.

विद्यमान सरकारने देशाला जॉबलेस ग्रोथ मिळवून दिलीय. एनडीए सरकारच्या शासनकाळात 80 लाख रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात आल्या होत्या, जेणे करुन विद्यमान सरकारने फक्त 20 लाख रोजगाराच्या संधी निर्माण केल्या.

**<u>शेतक-यांची बिकट परिस्थिती</u>**

भारतात 50 टक्क्यापेक्षा अधिक लोक कृषि क्षेत्राशी जोडले गेले आहेत, त्यांची अत्यंत वाईट परिस्थिती आहे. विद्‌यमान सरकारच्या शासनकाळात टर्म ऑफ ट्रेड शेतक-यांच्या विरोधात गेल्याचेच दिसुन येते. यातच लोनमाफी घोटाळा बाहेर पडला आहे.

मूळ योजनेत फेरफार करत अनेक लहान आणि अल्प श्रीमंतअसलेल्या शेतक -यांना लाभ मिळाला नाही. वास्तविकता वर्ष 1997 नंतरच्या लहान आणि अल्पश्रीमंत शेतक-यांना योजनेचा लाभ मिळायला पाहिजे होता. त्यातील अनेक शेतक-यांना अनेक कष्ट करुन मोठ्या त्रासाने कर्जाची भरपाई करावी लागली आणिकर्जमाफीचे पात्र झाल्यानंतर त्या योजने चा लाभ मिळाला नाही.

आघात होण्यासारखी घटना ही आहे की, मायक्रो फायनान्सईन्स्टीट्यूट कर्ज माफीला पात्र नसणा-यांना त्याचा लाभ देण्यात आला आहे.

कॅगच्या अनेक प्रकरणात फेरफार,लिखाणात बदल अशाप्रकारचे अनेक घोटाळे करण्यात आले आहेत. कॅगच्या अंदाजानुसारकर्जमाफीचे पात्र ठरलेल्या सहा ट क्के शेतक-यांना त्याचा फायदा देण्यात आलेला नाही. कर्जमाफीचे प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.भाजप अशी मागणी करत आहे की, तपासात ही बाब समोर आलीपाहिजे की, संपूर्ण घोटाळ्याला जबाबदार कोण आहे? दोषीं विरुद्धकडक कारवाई केली गेली पाहिजे.

कर्जमाफी नंतर देखील कृषिक्षेत्रात परिस्थिती वाईट आहे. अनेक शेतक-यांना आत्महत्या करावी लागेल अशी परिस्थिती आहे. कृषिआधारित बजेट लोप पा वत आहे, कारण खते, जंतूनाशक औषधे,बियाणे, पाणी, वीज आणि डिझेल च्या दरात कमालीची वाढ झालीआहे. मिनीमम सपोर्ट प्राईज आणि पीक उ त्पादन यांच्यातीलतफावत वाढली आहे. भाजप स्वामिनाथन आयोगाच्याफॉर्म्यु ल्यानुसार उत्पादन खर्चाची भरपाई प्लस 50 टक्के देण्याचीमागणी केली आहे
.

**बजेट-2013**

अर्थमंत्र्यांची नीति आणि कर प्रणालीत फक्त बाह्य देखावा सुंदर दिसेल असे बजेट सादर करण्यात आले आहे. संसदेत सादर झालेले कैंद्रिय अर्थसंकल्पाने भारतीय अर्थव्यवस्थेला खुप काही कमी देऊ केले आहे,असे वाटते. अर्थमंत्र्याने प्रतिकूल परिस्थितीत हा अर्थसंकल्प सादर केला. युपीए सरकारच्या नीतिगत पक्षाघातामुळे भारतीय अर्थव्यवस्था कठिण परिस्थितीत ढकलली गेली आहे. अर्थमंत्र्यांनी स्वतःला निःसहाय परिस्थितीत ठेवले आहे असेच वाटते. त्यामुळे त्यांची नीति आणि टॅक्सेशन पॉलिसीत फक्त बाह्य देखावा सुंदर वाटतो असा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. अर्थसंकल्पातील शाब्दिक मायाजाल पाहता त्या तुलनेने महत्त्वाकांक्षा खुप कमी आहे. भारतीय उत्पादनक्षेत्रात काही ठोस पावलांची उणीव भासून आली. कृषिक्षेत्रात पण सरकारने अवगणना केली आहे. सामान्य जनता शब्दांची परंपरागत उल्लेख पण अर्थसंकल्पात करण्यात आलेला नाही. निर्यातीला प्रोत्साहन देणे तसेच महागाई वर नियंत्रण ठेवण्याकरिता तसेच रुपायाला मजबूत बनवण्यासाठी कोणते खास पाउल उचलण्यात आले नाही. अर्थव्यवस्थेचा विकासदर(जीडीपी) पाच टक्के असल्याची धारणा दर्शविण्यात आल्यानंतर आता नऊ टक्के विकासदरापर्यंत अर्थव्यवस्था कशाप्रकारे पोचली जाईल या भावी योजनेकरिता अर्थसंकल्पात माहिती देण्यात आलेली नाही.

काही वर्गाला थेट आणि अप्रत्यक्ष कर लावण्यात आलेला आहे. दुसरीकडे खर्च आणि कपात करण्यात आली आहे, ज्यामुळे आर्थिक तूटीचा आकडा चांगला दिसेल. अर्थसंकल्प दस्ताऐवजात अनेक उदाहरणे पाहायला मिळतात. चालू वर्षात फूड सबसिडी बिलाचा आकडा रु, 75,000 करोडची तरतूद करण्यात आल्याचा अंदाज बांधण्यात आला होता त्यात सुधार करुन 85,000 करोड़ खर्च अंदाज करण्यात आला. तर पुढील वर्षातील बजेट मध्ये कपात करुन 80,000 करोड करण्यात आले आहे. अर्थमंत्र्यांनी फूड सिक्योरिटी बिलात अधिक रु. 10,000 करोड अधिक दिल्याचा दावा केला आहे.

वास्तविक पाहता अधिक परिणामकारक रु. 5,000 करोड आहेत ती वाढ अत्यंत क्षुल्लक आहे. आरोग्य मिशनमध्ये चालू वर्षात बजेट मध्ये रु.18515 करोडची तरतूद करण्यात आली होती त्यात सुधार करुन रु 15411 करोड करण्यात आली आहे. आगामी वर्षात त्यात फक्त रु.3000 करोडची क्षुल्लक वाढ करण्यात आली आहे. पंचायत राजमध्ये पण अशीच परिस्थिती आहे. युपिए च्या रोजगार हमी योजनेच्या मागे रु.40,000 करोड वाटण्याचे वचन देण्यात आले होते. मागील दोन वर्षात त्या रक्कमेत कपात होऊन रु.33,000 करोड करण्यात आली आणि चालू वर्षात रु. 29387 करोड खर्चाचा अंदाज बांधण्यात आला आहे, ज्यामुळे येत्या वर्षात त्यात आणखी कपात करण्यात येईल असे वाटते. अर्थमंत्र्यांनी त्याचा सूचीत लक्ष्यांक 33,000 करोड केला आहे. पंतप्रधान रस्ते योजनेत रु.29677 करोडची तरतूद निष्फळतेचे ज्वलंत उदाहरण आहे. चालू वर्षात त्याचा सुधारित अंदाज 40 टक्के म्हणजेच 8,100 करोड आहे. चालू वर्षात त्याचा खर्च वाढून रु.15,690 करोड करणार अशी धारणा आहे.
रोकड रक्कम थेट लाभार्थींच्या खात्यात जमा करण्याच्या योजनेला युपीए सरकारने स्वताची विशिष्ट योजना असल्याचा दावा केला आहे.

एकूण 26 योजनेमागे रु.5595.02करोड वाटण्यात आले आहेत. आतापर्यंत त्यामागे मात्र रु. 5.38 करोडचा खर्च करण्यात आला असा अंदाज आहे. बजेट मध्ये अनेक आव्हाने पण दर्शविण्यात आली आहेत, ज्यामुळे रु. 96980 करोडची पेट्रोलियम सबसिडीत कपात करुन रु. 65,000 करोड करण्यात आली. याचा अर्थ असा आहे की, पेट्रोल-डिझेल आणि गॅसचे भाव यापुढेही वाढण्याची शक्यता आहे.

भाजप अशी मागणी करतो की...

- पेट्रोल-डीझेलचे वाढलेले दर मागे घेण्यात यावे, गॅस सिलेंडर मर्यादा हटवून देण्यात यावी
- सर्व जीवनावश्यक वस्तुंच्या दरा संदर्भात नीति नक्की करण्यात यावी

- लघुत्तम टेका भाव  खर्च उपरांत 50 टक्के दर ठेवण्यात यावे
- शेतक-यांना लोनमाफी देण्यात यावी.
- खताचा भाव कमी करण्यात यावा.

विद्यमान सरकारने भाजपच्या या मागणीचा स्वीकार नाही केला तर उग्र जन आंदोलन करण्यात येईल